# स्वातंत्र्यदिनानिमित्त लोकमान्य राष्ट्रोत्सव ठेव योजना प्रारंभ

■ मुंबई

**आझादी** का अमृत महोत्सवानिमित्त लोकमान्य राष्ट्रोत्सव ठेव योजना १ ऑगस्ट २०२२ पासून सुरू झाली असून योजनेचा शेवटचा दिवस ३१ ऑगस्ट २०२२ आहे.

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाल्यानिमित्त ही योजना सुरू केली आहे. ठेवीची किमान रक्कम ७५ हजार रुपये आणि त्यानंतर ७५ हजारच्या पटीत आहे. ठेवीची मुदत ७५० दिवस इतकी आहे. व्याजदर ९.७५ टक्के असून दर तिमाहीत व्याज दिले जाईल. योजनेच्या इतर अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत. ही ठेव योजना केवळ सदस्यांसाठीच उपलब्ध आहे. पाल्यांच्या नावे सुध्दा ह्या योजनेत भाग घेण्याची सोय आहे, पण पालकांनी संस्थेचे सभासद असणे गरजेचे आहे. ठेव रकमेच्या ९० टक्क्यांपर्यंत कर्ज सोय उपलब्ध आहे. मुदत पूर्व ठेव काढायची पण मुभा आहे. अधिक माहितीसाठी लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटीच्या नजीकच्या शाखेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



श्री बिहारी शरण खंडेलवाल प्रस्तुत श्री कृष्ण संगिनी यमुना हा चित्रपट ५ ऑगस्ट रोजी मुंबईत प्रदर्शित झाला. महाराणी फिल्म अँड फिल्म्स गॅलरीच्या बॅनरखाली बनलेल्या श्री कृष्ण संगिनी यमुना या चित्रपटाला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम आणि दाद मिळाली. डॉ. शशी बिहारी खंडेलवाल आणि श्याम उपाध्याय निर्मित आणि डॉ. शशी बिहारी खंडेलवाल दिग्दर्शित हा चित्रपट श्री कृष्णाची चौथी पत्नी श्री यमुना मैया हिचे पृथ्वीवर अवतरणे आणि तिच्या भक्तांना मुक्त करणारी कथा सांगते. या चित्रपटात अभिनेत्री आकांक्षा पाल, मनीष गर्ग, नीलम कुमारी, अनुज भारद्वाज, हर्षिता वर्मा आदी कलाकार आहेत.

# ठाणे ग्रामीणचे जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील यांचा राजीनामा

■ ठाणे

**ठाणे** ग्रामीणमध्ये शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. ठाणे ग्रामीणचे जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. याआधीही प्रकाश पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. मात्र शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांच्या मनधरणीनंतर त्यांनी तो मागे घेतला होता.

## पक्षाकडून वारंवार अपमानित केले

आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर प्रकाश पाटील म्हणाले की, भिवंडी ग्रामीणचे आमदार आणि माझे सहकारी शांताराम मोरे हे एकनाथ शिंदे गटात गेल्याने शिवसेना पदाधिकाऱ्यांचा माझ्यावर अविश्वास निर्माण झाला होता. पक्ष व पक्षनेतृत्वाकडून मला अपमानित वागणूक मिळत होती. मला असे वाटते पक्षाच्या मनात माझ्या जागी नवीन लोकांना संधी देण्याचा विषय आहे. मी या पदासाठी अडथळा ठरु नये म्हणूनच स्वतःहून माझ्या पदाचा राजीनामा देत आहे, असेही ते म्हणाले. दरम्यान, ठाणे जिल्हा शिवसेना ग्रामीण जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील यांचे विश्वासू भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे हे एकनाथ शिंदे गटात दाखल झाले तेव्हापासून पाटील यांच्याकडे जिल्ह्यात संशयाने पाहण्यास सुरुवात झाली होती. पाटील हेसुद्धा लवकरच शिंदे गटात दाखल होतील, अशा वावड्या उठवण्यात आल्या. त्यामुळे व्यथित झालेल्या प्रकाश पाटील यांनी जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा देऊन फक्त शिवसैनिक म्हणून कार्यरत राहण्याचा निर्णय घेतला होता. मात्र शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांनी आयोजित बैठकीत त्यांची मनधरणी केली. त्यामुळे पाटील यांनी आपला राजीनामा तूर्त स्थगित केला होता.

# राहुल गांधींची बेरोजगारीच्या मुद्यावरून केंद्र सरकारवर टीका

■ नवी दिल्ली

**देशातील** वाढती महागाई, बेरोजगारी या मुद्यांवरून काँग्रेसने सभागृहासह रस्त्यावर उतरून आंदोलन केले आहे. राहुल गांधी यांनी ट्विटरवरून देशातील वाढत्या बेरोजगारी आलेखात पोस्ट करत प्रत्येक घरात बेकारी असल्याची टीका केली आहे. त्यांनी देशातील बेरोजगारी प्रश्नावर मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे. प्रत्येक घरात रोजगार हवा परंतु प्रत्येक घरात बेरोजगारी दिसून येत आहे. देशातील तरुणांच्या बेकारीचे प्रमाण २८.३ टक्के असल्याचे आलेखात दिसून येत आहे.

५ ऑगस्टला काँग्रेसने संपूर्ण देशभर महागाई, बेरोजगारी यावरुन आंदोलन केले होते. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्यावर काँग्रेस केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली होती. काँग्रेसने तरुणांच्या बेकारीचा मुद्दा लावून धरला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'हर घर तिरंगा' अभियानात सर्व देशवासीयांनी आपल्या घराच्या छतावर राष्ट्रध्वज फडकावण्याचे आवाहन करतानाच फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी समाजमाध्यमी खात्यांचा 'डीपी' म्हणूनही तिरंगा ठेवण्याचे आवाहन केले होते.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आपला डीपी बदलला आहे. मात्र या डीपीमध्ये फक्त तिरंगा नाही तर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हातात तिरंगा घेतलेला फोटो ठेवला आहे. यासोबत एक मेसेजही लिहिण्यात आला आहे, तो म्हणजे देशाची शान आहे तिरंगा, प्रत्येक भारतीयाच्या हृदयात आहे तिरंगा. यातून त्यांनी मोदींच्या आवाहनाला टोला लगावला आहे.

# पालिका सीसीटीव्ही बसविताना कंपनीचे ३८० कोटी माफ करणार

■ मुंबई

**मुंबईकरांच्या** सुरक्षिततेसाठी शहरात राज्य सरकारच्या गृहविभागामार्फत पाच हजार सीसीटीव्ही बसविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र हे काम करताना खोदकाम झाल्यावर चर बुजविण्यासाठी येणारा ३८० कोटींचा खर्च मुंबई महापालिका कंपनीला माफ करणार असून ते काम पालिका स्वतः करणार आहे. विशेष म्हणजे यासंदर्भात राज्य सरकारने केलेल्या सूचनेनुसार महापालिकेने हे शुल्क माफ करण्याचा प्रस्ताव प्रशासकीय अधिकारात मंजूर केला आहे. मात्र ही माफी मुंबईकरांच्या माथी मारली जाणार आहे. त्यामुळे या प्रशासकीय निर्णयाचा फटका सामान्य नागरिकांना बसण्याची शक्यता आहे.

मुंबईत आतापर्यंत पाच हजार सीसीटीव्ही बसविण्यात आले असून आणखी पाच हजार सीसीटीव्ही बसविले जाणार आहेत. त्याचे कंत्राट एल अ‍ॅण्ड टी कंपनीला देण्यात आले आहे. वास्तविक हे काम करताना चर खोदावी लागते आणि ती पुन्हा बुजवावी लागते. ही चर बुजविणे संबंधित कंपनीला बंधनकारक असते. त्यासाठी पालिकेतर्फे ३७९.९८ कोटी रुपये शुल्क आकारले जाणार होते. मात्र हे शुल्क माफ करावे अशी मागणी कंपनीने राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे केली होती. कारण सीसीटीव्ही बसविण्याचे काम राज्य शासनाच्या गृहविभागाच्या माध्यमातून होणार आहे. त्यामुळे राज्य सरकारने हे कंपनीचे शुल्क पालिकेने माफ करावे, अशी सूचना राज्य सरकारने महापालिकेला केली. या सूचनेचा प्रस्ताव सध्या प्रशासकीय अधिकाराखाली मंजूरही करण्यात आला आहे. त्यामुळे आता सरकारने सीसीटीव्ही बसविण्याचे काम केले असले तरी त्यासाठी खोदावी लागणारी चर बुजविण्याचे काम मुंबई महापालिका स्वतः करणार आहे.

**WE ARE HIRING**
**Sales Executive (Concept Selling)**
- कोणत्याही शाखेचा पदवीधर
- जाहिरात, इव्हेंट, मिडिया प्रॉडक्ट विकण्याची तयारी.
- संकल्पना तपशिलात समजून घेऊन जाहिरातदाराला विकणे.
- प्रपोजल तयार करता येणे.
- आवश्यक वेळेचे नियोजन, स्मार्ट, चिकाटी, प्रेझेंटेबल.

**कामाचे ठिकाण : मुंबई, रायगड**
संपर्क
mahamtbjobs@gmail.com
आजच आपला बायोडेटा पाठवा.

## रिषी टेकटेक्स लिमिटेड

सीआयएन: L28129MH1984PLC032008
६१२, व्ही. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, १०-१४ पायस स्ट्रीट, भायखळा (पश्चिम), मुंबई - ४०० ०११.
दूरध्वनी क्र.: (०२२) २३०७५६७७ / २३०७४५८५, ; फॅक्स क्र.: (०२२) २३०८००२२
ईमेल: info@rishitechtex.com वेबसाईट: www.rishitechtex.com

**दि. ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरणपत्र**

(₹ लाखात)

| तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|
| | ३०.०६.२०२२ | ३०.०६.२०२१ | ३१.०३.२०२२ | ३१.०३.२०२२ |
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| कार्यातून एकूण महसूल | २४१६.७० | २०२५.१८ | २५००.७७ | १००८५.७५ |
| कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्व) | ३०.२० | ४४ .६३ | ७२.९४ | २०९.४७ |
| कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | ३०.२० | ४४ .६३ | ७२.९४ | २०९.४७ |
| कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | २२.१२ | ४४ .६३ | ३३.२१ | १३१.८५ |
| कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट) | २२.३९ | ४४.८९ | ३२.३२ | १३०.९६ |
| सम भाग भांडवल | ७३९.१० | ७३९.१० | ७३९.१० | ७३९.१० |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळता इतर इक्विटी | ० | ० | २१९९.३२ | २१९९.३२ |
| प्रति सम भाग उत्पन्न (₹ १०/ प्रत्येकी) (चालू आणि खंडीत परिचालनाकरिता) | | | | |
| मूळ : | ०.३ | ०.६० | ०.४५ | १.७८ |
| सौम्यीकृत : | ०.३ | ०.६० | ०.४५ | १.७८ |

**टिपा:**
१. वरील विवरण हे सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या दि. ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे.
२. उपरोल्लेखित निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ८ ऑगस्ट, २०२२ रोजी पार पडलेल्या सभेमध्ये त्यास मंजुरी देण्यात आली आणि सेबी (एलओडीआर) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ नुसार वरील वित्तीय निष्कर्षाचे वैधानिक लेखापरिक्षकांनी मर्यादित पुनरावलोकन आयोजित केले होते.
३. सदर वित्तीय निष्कर्ष कंपन्यांचे (भारतीय लेखा मानके) विनियमन, २०१५ च्या नियम ३ आणि कंपन्या (भारतीय लेखा मानके) सुधारणा नियमन, २०१६ सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अन्वये विहीत कंपन्यांचे (भारतीय लेखा मानके) विनियमन, २०१५ च्या अनुषंगाने बनविण्यात आले आहेत.
४. गत कालावधीचे आकडे जेथे आवश्यक तेथे पुनर्गठीत/ पुनर्मांडणी/ पुनर्वर्गीकृत करण्यात आले आहेत.
५. वित्तीय निष्कर्षाचे विस्तृत प्रारूप स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट आणि कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.rishitechtex.com येथे उपलब्ध आहेत.

**रिषी टेकटेक्स लिमिटेड** करिता
सही/-
**अभिषेक पटेल**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन: ०५१८३४१०**

ठिकाण: मुंबई
दिनांक: ८ ऑगस्ट, २०२२

**रामेश्वर मीडिया**

## SBI भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५–२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली – ११००५५ (इमेल आयडी: **sbi.igr@alankit.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक पासून | प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत | विभिन्न क्रमांक पासून | विभिन्न क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०२२६२८९६ | दविंदर सिंग सलूजा | ५०० | १८५९१४ | १८५९१४ | ७४४०१००७०१ | ७४४०१०१२०० |
| २ | ०२३३८२९० | स्मिता सोगानी | ५०० | १९१२२५ | १९१२२५ | ७४४२८१५५४१ | ७४४२८१६०४० |
| ३ | ०१७१००९३ | भारत ए गांधी भारती बी गांधी | १००० | १५२५९३ | १५२५९३ | ७४२३०११९४१ | ७४२३०१२९४० |
| ४ | ००८७५५१२ | जी एल एस बाबू राव | ३० | ९०७५५ | ९०७५५ | ७३९५४०८९३१ | ७३९५४०८९६० |
| ५ | ०१४१९८९१ | मेहता नीरव किशोरभाई पारेख राजेश चमकलाल | ५०० | १३१५६२ | १३१५६२ | ७४१२११२३७१ | ७४१२११२८७० |
| ६ | ०१६१४२४७ | प्रमोद बबनराव भांडकर | ५०० | १४४४८८ | १४४४८८ | ७४१८८७६३९१ | ७४१८८७६८९० |
| ७ | ०६०१३३९५ | भारती रवींद्र बरगे | १२०० | २२५०२९ | २२५०२९ | ७४५९४०७५०१ | ७४५९४०८७०० |
| ८ | ०७३०८८८३ | सतीश वाय एस प्रेमा के एम | १७६ | ६१०८८९० | ६१०८८९० | ७९८३७३६५४४ | ७९८३७३६७१९ |
| ९ | ००७०२३०० | अशोक कुमार मुखोपाध्याय स्वप्ना मुखर्जी | ५०० | २६५३१ | २६५३१ | ७३७९२१२६११ | ७३७९२१३११० |
| १० | ०२३६७४७७ | श्रीमती शबाना परवीन | ६०० | १९२०७८ | १९२०७८ | ७४४३२४०९११ | ७४४३२४१५१० |
| ११ | ०१२०३६२८ | इंद्राणी मुखर्जी कौशिक मुखर्जी | ५०० | १२३७५० | १२३७५० | ७४०८२०३६९१ | ७४०८२०४१९० |
| १२ | ००७८२३६० | बासुदेव यादव शारदा यादव | ६४० | ५५८१४ | ५५८१५ | ७३८६७३४४९१ | ७३८६७३५१३० |
| १३ | ०७५१४६४४ | कमलेश विजय | २८० | ६३१४६८९ | ६३१४६८९ | ८०६१०४६५३२ | ८०६१०४६८११ |
| १४ | ०२०३९६२४ | रामा | ६०० | १६९६१४ | १६९६१४ | ७४३१६७८६११ | ७४३१६७९२१० |
| १५ | ०२०३९६२३ | प्रेम नाथ | ६०० | १६९६१३ | १६९६१३ | ७४३१६७८०११ | ७४३१६७८६१० |
| १६ | ०१२८१०८४ | तपन मुखर्जी | ५०० | १२७०२४ | १२७०२४ | ७४०९८७७१०१ | ७४०९८७७६०० |
| १७ | ०७४०४२३५ | मोहम्मद मेदीन मंसूर | २२० | ६२०४९३४ | ६२०४९३४ | ८०१०४९२४८३ | ८०१०४९२७०२ |
| १८ | ०११६६७९४ | सुधा अग्रवाल | ५०० | ७१८५ | ७१८५ | ७३७११२७८११ | ७३७११२८३१० |
| | | | १५० | १२०२३४ | १२०२३४ | ७४०६४०६८३१ | ७४०६४०६९८० |
| १९ | ००८२३१३५ | ललतानपुइया | ५३० | ७१९६८ | ७१९६९ | ७३९०७४४७४१ | ७३९०७४५२७० |
| २० | ०७५०५४८२ | एस एल कुर्दिया | २८० | ६३०५५४६ | ६३०५५४६ | ८०५९०१३४६७ | ८०५९०१३७४६ |
| २१ | ०१८०३३०२ | दह्याभाई रेवाभाई सोलंकी | ५०० | १५४८०५ | १५४८०५ | ७४२४११९४४१ | ७४२४११९९४० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ०९.०८.२०२२

समभागांची संख्या: १०८०६
स.प्रमाणपत्रांची संख्या: २४

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)

# डोंबिवलीत बुलेटला भीषण आग

■ डोंबिवली

**डोंबिवली** पूर्वेतील टिळक पुतळा ते पाथर्ली नाका दरम्यानच्या मंजुनाथ शाळा परिसरातील रस्त्यावर उभ्या करुन ठेवण्यात आलेल्या एका बुलेटला आज सोमवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत बुलेट जळून खाक झाली असून सुदैवाने जीवितहानी झाली नाही. टिळक रस्ता ते घरडा सर्कल हा सर्वाधिक वर्दळीचा रस्ता आहे. आज सकाळी साडेअकराच्या सुमारास बौध्द युवक मित्र मंडळाच्या प्रवेशद्वार फलकासमोर एक बुलेट वाहन मालकाने उभी करून ठेवली होती.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

मुख्य अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदाद्वारे एक बोली प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करत आहेत. **कामाचे नावः नांदगाव गिट्टी डेपोमध्ये गिट्टीचा पुरवठा आणि स्टॅकिंग, वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी आणि वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, कारवार यांच्या कार्यक्षेत्रात केआरसीएल हॉपर्समध्ये लोड करणे, गिट्टीचे अनलोडिंग, पसरवणे आणि बॉक्सिंग. निविदा सूचना संः केआर-डब्ल्यू-1-58-2022-09. कामाची किंमतः रु. 5,99,78,880/- जीएसटी वगळून. ऑनलाइन ऑफर्स/बोली जमा करण्याची शेवटची तारीख/वेळः 01.09.2022 रोजी 15:00 वाजेपर्यंत. पूर्ण होण्याचा कालावधीः पावसाळ्यासह चौवीस महिने**. मॅन्युअल ऑफर्स स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया **https://ireps.gov.in** वेबसाइटला भेट द्या. शुद्धीपत्र/परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.

## फॉर्म ए
## जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**मेगी अ‍ॅग्रो केम लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **मेगी अ‍ॅग्रो केम लिमिटेड** |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | ०३ फेब्रुवारी, १९९९ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U24210MH1999PLC118134 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ५०४, नीलांबरी, ठाणे बेलापूर रोड, विटावा, ठाणे महा. ४०० ६०५ भारत |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | ५ ऑगस्ट, २०२२ |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | १ फेब्रुवारी २०२३ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **वाकाती बालासुब्रमण्यम रेड्डी** IBBI/IPA-001/IP-P00662/2017-18/11131 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | ई ५०५, गॅलेक्सी, कुरेशी नगर, कुर्ला (पूर्व) मुंबई ४०००७०. vbsreddy7@gmail.com मोबाईल क्रमांक ८३६९१ ७०४८४ |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | सी १२०५, गॅलेक्सी, कुरेशी नगर, कुर्ला (पूर्व) मुंबई ४०००७०. ipmegiagro@gmail.com मोबाईल क्रमांक ८३६९१ ७०४८४ |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १९ ऑगस्ट, २०२२ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | वर्गा(र्गा)चे नाव |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | वेब लिंकः https://ibbi.gov.in/en लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दिनांक ५ ऑगस्ट, २०२२ रोजी मेगी अ‍ॅग्रो केम लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. मेगी अ‍ॅग्रो केम लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. १९ ऑगस्ट, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय धनकोने, फॉर्म सीएमधील वर्गाचे (वर्ग नमूद करावा) अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**
अंतरिम ठराव व्यावसायिकाचे नाव व स्वाक्षरीः वाकाती बालासुब्रमण्यम रेड्डी
दिनांक : मुंबई,
ठिकाण : ८ ऑगस्ट, २०२२

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**जल अभियंता विभाग**

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा प्रपत्र क्र. | ७२०००३४३६६ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | **सअ जका (गंज नियंत्रण) अंतर्गत पउ मध्ये महाकाली गुंफा मार्गाच्या बाजुने १५०० मिमी व्यासाच्या एमएस डब्ल्यूएम करिता नवीन इम्प्रेस्ड करंट कॅथोडिक प्रोटेक्शन प्रणालीचे आरेखन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वयन.** |
| निविदेची किंमत | रु. ५,५००/- + जीएसटी (९% एसजीएसटी + ९% सीजीएसटी) |
| ई-निविदेची किंमत (अंदाजित किंमत) | रु. ४९,५७,२४०.००/- |
| बोली सुरक्षा अनामत /इरअ | **रु. ५०,०००/-** |
| निविदा पारित आणि विक्री करण्याचा दिनांक | दि. १०.०८.२०२२ रोजी स. ११.०० पासून |
| निविदा विक्री करण्याचा आणि बोली सुरक्षा अनामत स्वीकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २३.०८.२०२२ रोजी सायं. १६.०० वाजेपर्यंत |
| पाकिट अ, ब आणि क चे सादरीकरण (ऑनलाईन) | दि. २३.०८.२०२२ रोजी सायं. १६.०० वाजेपर्यंत |
| बोली-पूर्व सभा | लागू नाही |
| पाकिट अ उघडणे | दि. २४.०८.२०२२ रोजी १६.०१ वाजेनंतर |
| पाकिट ब उघडणे | दि. २४.०८.२०२२ रोजी १६.०५ वाजेनंतर |
| पाकिट क उघडणे | दि. ३०.०८.२०२२ रोजी १५.०० वाजेनंतर |
| संपर्काचा पत्ता | सहाय्यक अभियंता जल कामे (गंज नियंत्रण) यांचे कार्यालय, कॅ. विनायक गोरे उड्डाण पुलाच्या खाली, दादाभाई पथ, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०००५६. दूर. क्र. ०२२-२६२४०२६६ /९८१९३७९०७७ / ९०२१६२०६४६ ईमेलः mcgm.aewwcc@gmail.com / aewwcc01.he@mcgm.gov.in |
| बोली उघडण्याचे ठिकाण | सअ जका (गंज नियंत्रण) यांचे कार्यालयामध्ये ऑनलाईन |

**सदर निविदा प्रपत्र अ-हस्तांतरणीय आहे.**
वरील विषयाकरिता प्राप्त झालेली कोणतीही निविदा स्वीकारण्याचे किंवा कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता फेटाळण्याचे सर्व अधिकार बृमुंमपा राखून ठेवीत आहेत.

सही/- **स.अ. ज.का. (गं.नि.)**   सही/- **का.अभि.(परि.) एमडब्ल्यू**   सही/- **उप जल अभियंता (परिरक्षण)**

पीआरओ/१०५१/जाही/२०२२-२३

**खिडक्यासाठी जाळयाचा व मच्छरदाण्याचा वापर करा**

## पश्चिम रेल्वे

**स्वयंचलीत फायर डीटेक्शन आणि अलार्म प्रणालीचे प्रावधान**

निविदा क्र.: **SG/216/2/64/WA/R1; Dated: 08.08.2022**; विभागः सिग्नल व टेलिकॉम, कार्य आणि स्थळः मुंबई विभाग पश्चिम रेल्वेच्या ३ स्थानकांवर (वैतरणा, सफाळे आणि करंबेळी) स्वयंचलीत फायर डीटेक्शन आणि अलार्म प्रणालीचे प्रावधान करणे. (एएफडीएस) कामाचे अंदाजित मूल्य : रु. १०,४१,८६९.६७/-; जेथे ई - निविदा उघडेल त्या कार्यालयाचा तपशीलः वरिष्ठ विभागीय संकेत आणि दूरसंचार अभियंता ( उत्तर ), २ रा मजला, विभागीय रेल्वे व्यवस्थापकांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८; इसारा रक्कम ठेव : रु. २०,८००/-; ई - निविदेचा प्रकार : खुली ई - निविदा; ई - निविदा दस्तावेज सादरीकरण बंद होण्याची तारीख व वेळ : ०२.०९.२०२२ रोजी १५.०० वा. आणि ई -निविदा उघडण्याची तारीख व वेळ : ०२.०९.२०२२ रोजी १५.३० वाजता. http://www.ireps.gov.in या वेबसाईटवर निविदा पाहू शकता. 0332

आम्हाला लाईक कराः facebook.com/WesternRly

## जाहीर सूचना

याद्वारे तमाम सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात येते की, श्री. रियाझ हिमानी हे यारी रोड, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०६१ येथे स्थित लीला सागर को-ऑप. हौसिंग सोसा. लि., ("सदर संस्था")चे बोनाफाईड सदस्य आहेत आणि सातव्या मजल्यावरील सदनिका क्र. सी-७०७ ("सदर सदनिका") मोजमाप अदमासे ५१० चौ.फू. बिल्ट-अप आणि क्रमांक १८६ ते १९० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकी किमतीचे पाच पूर्णतः भरणा केलेले समभाग समाविष्ट असलेले भाग प्रमाणपत्र क्र. ०३८ ("सदर भाग प्रमाणपत्र") धारणकर्ते आहेत. ज्याअर्थी सदर भाग प्रमाणपत्र हरवले आहे/सापडत नाही, ज्याकरिता माझ्या अशिलांनी संबंधित वर्सोवा पोलीस स्थानक, अंधेरी (पश्चिम), मुंबई यांच्याकडे दिनांक ९ जुलै, २०२२ रोजी ११.३७.०५ वा. तक्रार/गहाळ अहवाल क्र. १८८०३-२०२२ नुसार पोलीस तक्रार दाखल केली आहे.
कोणी व्यक्ती/पक्षकार, न्यायिक, अर्ध-न्यायिक प्राधिकरण, वित्तीय संस्था, बँक यांचा वरील उल्लेखित सदर गहाळ/हरवलेल्या भाग प्रमाणपत्राच्या संदर्भात अन्यथा कोणत्याही स्वरूपाचा कोणताही आक्षेप असल्यास आणि/किंवा सदर मालमत्तेच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार किंवा अन्य कशाही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा इतर कोणत्याही प्रकारचा दावा असल्यास त्याबाबत निम्नस्वाक्षरीकारांना लेखी स्वरुपात खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह, सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास असा कोणताही दावा सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल आणि त्यानंतर कोणत्याही तक्रार/आक्षेपाची दखल घेतली जाणार नाही आणि ती रद्दबातल असेल.
दिनांक ०९ ऑगस्ट, २०२२

सही/-
श्री. सुरेश आर. सावंत
वकील, उच्च न्यायालय, मुंबई
दुकान क्र. ९, निशांत सोसायटी
अविनाश टॉवर समोर, सात बंगलोज,
अंधेरी (पश्चिम), मुंबई-५३.
कार्यालयः ८०९७००२८९०. मो.- ९८२१५२०७१२.
ईमेलः adv.sureshsawant@gmail.com

## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that My Clients are investigating the title to the premises referred to in the Schedule hereunder written, and intends to acquire the same.
Any persons having any maintainable right, title, interest, claim or demand whatsoever in respect of the premises by way of sale, exchange, mortgage, collateral, charge, gift, trust, muniment, inheritance, possession, lease, lien, maintenance, easement, devise, bequest, encumbrance or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing by SPAD/RPAD (together with supported with Notarially certified true copies of documentary evidence in support thereof) to the undersigned within 15 days from the date of publication hereof, failing which the investigations will be completed without any reference to any right, title and claim, if any, which shall deemed to have been waived and/or abandoned with notice.

**SCHEDULE**

ALL THAT Absolute right, title and interest in the Office No. 414, on Fourth Floor of the Building "The Summit Business Bay" admeasuring approx. total 842 Sq. Ft. Carpet Area i.e. 1010.40 Sq. Ft. Built up area (93.90 Sq. Mts.) Along with One Parking of 22.30 Sq. Mts. Built up area, on the Plot of Land situated at Village Gundavali, bearing CTS No. 265, 266, 266/1 to 172, Next to Gurunanak Petrol Pump, Near WEH Metro Station, Andheri Kurla Road, Andheri (East), Mumbai – 400093 in the Registration district & Sub-District of Mumbai Suburban.
Dated this 9th day of August, 2022

**Sd/-**
**Sunil Murli Kewalramani**
**Advocate High Court**
**Shop No.13, Blue Heaven CHS,**
**Plot No.1, Sector-5, Opp. Sahakar Bazar,**
**Airoli, Navi Mumbai 400708.**
**Mob. 9769140195**
**Email: sunilkewalramani24@gmail.com**

## जाहीर सूचना

जनतेच्या माहितीकरिता सर्व संबंधितांना याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील श्री. बूमिनाथन कौंडर हे गाव आंबिवली, मनिष नगर, जे. पी. रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३ च्या सीटीएस क्र. ८२६ आणि ८२७ येथे स्थित प्रमुख कृपा सीएचएस लि. च्या सी विंग च्या ४थ्या मजल्यावर स्थित सदनिका क्र. ४०९ आणि संस्थेचे बोनाफाईड सदस्य असल्याने भाग प्रमाणपत्र क्र. ३८ अन्वये समाविष्ट असलेले सदर संस्थेचे पाच पूर्णतः भरणा केलेले समभाग क्र. १८६ ते १९० (सदर सदनिका आणि सदर समभाग यापश्चात एकत्रितरित्या 'सदर मालमत्ता' असे उल्लेखित) चे धारणकर्ते श्री. हिमांशु चंडीदान रतनू यांच्याकडून खरेदी करु इच्छितात. सौ. बाजुबा चंडीदान रतनू ज्या सदर सदनिकेच्या पूर्ण आणि निःसंशय मालक होत्या, त्याचे दि. ०९.०१.२०१२ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात श्री. जशजित चंडीदान रतनू, श्री. राजेंद्र चंडीदान रतनू आणि श्री. हिमांशू चंडीदान रतनू हे त्यांचे केवळ कायदेसीर वारस आहेत, ज्यांनी त्यांच्या मृत्यूपश्चात सदर मालमत्तेमधील त्यांचे सर्व हक्क वारसा हक्काने प्राप्त केले आहेत. सदर श्री. जशजित चंडीदान रतनू आणि श्री. राजेंद्र चंडीदान रतनू यांनी क्र. बीडीआर-१७/९८६८/२०२१ अन्वये नोंदणीकृत दिनांक ०६.०९.२०२१ रोजीच्या हक्कसोड करारपत्राद्वारे त्यांच्याकडे असलेले सदर मालमत्तेमधील वारसा हक्क श्री. हिमांशू चंडीदान रतनू यांच्या नावे सोडले आहेत, जे त्यामुळे आता सदर मालमत्तेचे संपूर्ण आणि निःसंशय मालक झाले आहेत.
सदर मालमत्तेच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, कॉपीराईट दस्तावेज, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार, देखभाल, वहीवाट, इच्छापत्र, मृत्यूपत्र किंवा बोजा किंवा अन्य कशाही मार्गे कोणताही दावा असणाऱ्या आणि/किंवा सदर मालमत्ता विक्री करण्यास कोणत्याही प्रकारचा आक्षेप असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत निम्नस्वाक्षरीकारांना कागदोपत्री पुराव्यासह सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात कळवावे, असे न केल्यास, असा कोणताही दावा दुर्लक्षित केला जाईल आणि सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल.
दि. ९ ऑगस्ट, २०२२

**पूनम जी. साळसकर,** वकील
१०७/बी-विंग, सहारा क्लासिक,
सहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९९.

**रामेश्वर मीडिया**